

# गरुड झेप

( जनता सहकारी बँक लि., पुणे द्वारा प्रकाशित गृहपत्रिका : केवळ खाजगी वितरणासाठी ) एप्रिल–२०२४

## ₹ १५०००,००,००,०००

### व्यवसायाचा टप्पा यशस्वीपणे पूर्ण



## Audited Financial Indicators

(₹ in Crore)

| Particulars | 31.3.2024 | 31.3.2023 |
|---|---|---|
| Total Deposits | 9,625.86 | 9,166.42 |
| Advances | 5,664.30 | 5,120.46 |
| Business Mix | 15,290.16 | 14,286.88 |
| Operating Profit | 135.21 | 145.42 |
| Net Profit After Tax | 49.09 | 8.13 |
| Business Per Employee | 13.04 | 11.80 |
| Gross NPA | 5.33% | 6.52% |
| Net NPA | 2.65% | 2.80% |

## संपादकीय

सस्नेह नमस्कार,

सर्व प्रथम ज्यांच्या अर्थपूर्ण भक्कम, आणि निस्वार्थी पाठिंब्यामुळे व बँकेप्रती दाखविलेल्या दृढ विश्वासामुळे प्रगती करता आली त्या आपण सर्व भागधारक, ठेवीदार, खातेदार, ग्राहक आणि समस्त हितचिंतकांचे मन:पूर्वक आभार व्यक्त करतो.

दि.३१.०३.२०२४ अखेरच्या आर्थिक वर्षाचा अहवाल दि. १५.०४.२०२४ रोजी बँकेने सादर केला आहे. आपल्या बँकेने मार्च २०२४ अखेर रू. १५,००० कोटी पेक्षा जास्त व्यवसाय आपणां सर्वांच्या भक्कम पाठिंब्यावर पूर्ण करण्यात यश मिळविले आहे.

अमृत महोत्सवी वर्षात व्यवसायाच्या विविध क्षेत्रात बँकेने लक्षणीय यश मिळविले आहे. दि ३१.०३.२०२४ अखेरील Key Performance Indicator चे अवलोकन करता एकत्रित व्यवसायामध्ये रू. १००३ कोटी नवीन व्यवसाय वाढ झाली आहे. तसेच करोत्तर नफा (रू. ८.१३ कोटी वरून रू. ४९.०९ कोटी), प्रती सेवक व्यवसाय (रू. ११.८० कोटी वरून रू. १३.०४ कोटी), CRAR (१३.७२% वरून १४.२७%) अशी लक्षणीय वाढ झालेली आहे. त्याचप्रमाणे ग्रॉस एनपीए (६.५२% वरून ५.३३%) तसेच नेट एनपीए मध्ये (२.८०% वरून २.६५%) एवढी घट साध्य करण्यात बँकेला यश मिळाले आहे. ग्राहकांना Hassel Free बँकिंग व्यवहार Digitally करता यावेत याकरीता बँकेने केलेल्या प्रयत्नांना चांगले यश मिळालेले असून एकूण व्यवहारांपैकी ८०% व्यवहार Digital माध्यमातून होत आहेत.

आर्थिक वर्ष २०२३–२४ मध्ये आपल्या बँकेने व्यवसाय वाढ करीत असताना गुणवत्तापूर्ण व उद्दिष्टपुर्तता करणारा व्यवसाय करण्याकडे विशेष भर दिला आहे. तसेच कर्ज वितरण करताना अधिक संयमित व चिकित्सक धोरणाचा अवलंब केला आहे. यापुढेही बँक त्याच मार्गावर मार्गक्रमण करणार आहे.

सहकारी बँकांकडून रिझर्व्ह बँकेच्या असणाऱ्या अपेक्षा मा. गव्हर्नर यांनी बँकांबरोबर घेतलेल्या मिटींगमध्ये व्यक्त केल्या होत्या. आपल्या बँकेने त्याप्रमाणे Good Corporate Governance, Adoption of Timely Compliance Culture, Introduction of Risk Based Credit Policy, Implementation of Risk Based Internal Audit, Appointment of Chief Risk Officer (CRO) इ. गोष्टी त्वरीत अंमलात आणल्या आहेत.

आर्थिक वर्ष २०२४–२५ मध्ये ग्राहक हित हेच उद्दिष्ट व पक्की तत्वे यांच्या सहाय्याने बँक अमृत महोत्सवी वर्षात समर्थपणे प्रगतीच्या वाटेवर वाटचाल करेल असा विश्वास व्यक्त करतो. आपले जनता बँकेवर प्रेम आहे ते वृध्दिंगत होत राहो. बँकेच्या वाटचालीमध्ये सन्माननीय सभासद, ठेवीदार, खातेदार, हितचिंतक, यांनी दिलेला पाठिंबा व सहकार्य याबद्दल कृतज्ञता व्यक्त करतो.

**रविंद्र हेजीब**
अध्यक्ष

# ● अमृत महोत्सव वर्ष उद्‌घाटन कार्यक्रम क्षणचित्रे ●





दिपप्रज्वलन करुन कार्यक्रमाची सुरुवात करताना मा.ना.श्री. देवेंद्रजी फडणवीस, प.पू. भूषण स्वामी महाराज
मा.ना.श्री. चंद्रकांत दादा पाटील, बँकेचे अध्यक्ष मा.श्री. रविंद्र हेजीब, उपाध्यक्षा मा.सौ. अलका पेटकर,
मुख्य कार्यकारी अधिकारी मा.श्री. जगदिश कश्यप




मा.ना.श्री. देवेंद्रजी फडणवीस यांचे स्वागत करताना
मा.श्री. रविंद्र हेजीब




अमृत महोत्सवी वर्ष बोधचिन्हाचे (लोगो) अनावरण करताना
मा.श्री. देवेंद्रजी फडणवीस




गरुडझेप या बँकेच्या गृहपत्रिकेचे प्रकाशन करताना मान्यवर



उपस्थितांना संबोधित करताना मा.ना.श्री. देवेंद्रजी फडणवीस

# महाराष्ट्राच्या आर्थिक प्रगतीमध्ये बँकांचे योगदान मोठे :- मा.श्री. देवेंद्र फडणवीस

बँकेच्या अमृत महोत्सवी वर्षाचा शुभारंभ दि.१८ ऑक्टोबर २०२३ रोजी बालगंधर्व रंगमंदिर पुणे, येथे दिमाखदार कार्यक्रमाने झाला. कार्यक्रमास उद्घाटक म्हणून महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री मा.श्री. देवेंद्रजी फडणवीस, प्रमुख पाहुणे राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री मा.श्री. चंद्रकांत दादा पाटील, आशीर्वचन देण्यासाठी श्री रामदास स्वामी संस्थान, सज्जनगडचे अध्यक्ष प.पू. श्री. भूषण स्वामी महाराज, बँकेचे अध्यक्ष श्री. रविंद्र हेजीब, उपाध्यक्षा सौ. अलका पेटकर, संचालक श्री. माधव माटे, प्रभाकर परांजपे, मकरंद अभ्यंकर, किसन खाणेकर, किरण गांधी, मंदार लेले, अमित घैसास, मंदार फाटक, श्रीरंग परस्पाटकी, मिलींद लिमये, कानिफनाथ भगत, श्रीकांत पोतनीस, रघुराज बाहेती, प्रभाकर कांबळे, सौ. पद्मजा कुलकर्णी, मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. जगदीश कश्यप व्यासपीठावर उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व बँकेच्या स्थापनेमागील प्रेरणास्थान कै.श्री. मोरोपंत पिंगळे यांच्या प्रतिमा पूजनाने झाली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना श्री. जगदीश कश्यप यांनी बँकेच्या ७४ वर्षातील प्रगतीचा आलेख सादर केला. आर्थिक क्षेत्रात काम करीत असतानाच बँकेने सामाजिक जबाबदारीचे देखील कायम पालन केले आहे. भूकंप, पूर अशा नैसर्गिक आपत्तीच्या काळात बँक व सर्व सेवक नेहमी अग्रभागी राहिले आहेत. यापुढेही बँक व्यवसायाच्या आघाडीवर कायम पुढे राहिल असा विश्वास व्यक्त केला. बँकेचे अध्यक्ष मा. श्री. रविंद्र हेजीब यांनी उपस्थित सर्वांचे स्वागत केले. पुढील १२ महिने सभासद मेळावे, रक्तदान शिबीर, सायबर सेक्युरिटी जागरूकता व्यावसायिक मेळावे, बँक परिषद असे १२ कार्यक्रम करण्यात येतील असा मनोदय व्यक्त केला.

अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त बोधचिन्हाचे अनावरण श्री. देवेंद्रजी फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले. तसेच बँकेची गृहपत्रिका गरुडझेप विशेषांकाचे प्रकाशन उपस्थित मान्यवरांच्या हस्ते झाले. बँकेचे सेवक श्री. प्रसाद जोशी यांनी बँकेच्या ७४ वर्षाच्या कालखंडातील वैशिष्ट्यपूर्ण कामगिरीची माहिती देणारे कॉफीटेबल बुक तयार केले असून, प्रत्येक पानावर बँक स्थापना दिनातील १८-१० व कामगिरी वर्षाचे साल असा सिरिअल क्रमांक असणारी चलनी नोट लावलेली आहे. त्याचे प्रकाशन मा.श्री. देवेंद्रजी फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले.

श्री. देवेंद्रजी फडणवीस म्हणाले, स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्षानंतर जनता बँकेचे अमृतमहोत्सवी वर्ष सुरु होत आहे याचा अतिशय आनंद आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या विचारांनी प्रेरित झालेल्या व्यक्तींनी जनता सहकारी बँकेची मुहूर्तमेढ रोवली. विश्वास आणि निस्वार्थ भावनेने काम करणे ही राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची शिकवण आहे. या विचारांवरच जनता बँकेची वाटचाल सुरु आहे. त्यामुळेच जनता बँक आणि सर्वसामान्य खातेदार यांचे संबंध आजही घट्ट राहिले आहेत. विश्वस्ताच्या भूमिकेतून जनता बँकेने काम केल्यामुळे ग्राहकांचा विश्वास मिळविता आला. वृद्धींगत झाला व त्याचे रुपांतर बँकेच्या व्यावसायिक प्रगतीमध्ये झाल्याचे दिसते.अन्य बँकेचे विलीनीकरण करुन ग्राहकांचा सहकार क्षेत्रावरील विश्वास कायम ठेवण्याचे काम बँकेने केले आहे. तंत्रज्ञानाचा योग्य वेळी अंगीकार करून स्पर्धेत टिकणे, आपल्याबरोबर अनेक बँकांना सहकारी भावनेने सहाय्य केले हे फार महत्वाचे आहे.

बँकिंगमध्ये अनेक बदल घडत आहेत. मूळ विचार न सोडता या बदलांना अनुसरुन मार्केटशी समरस व्यवस्था बँकांना उभ्या कराव्या लागतील. जेव्हा आपण प्रगती करतो तेव्हा त्या प्रगतीला धरुन रहावे लागते. प्रगती सोबत येणाऱ्या आव्हानांचा सामना देखील करावा लागतो. आज सहकार क्षेत्रात स्पर्धक जास्त आहेत. आपण एकमेकांना सोबत घेऊन जर पुढे गेलो तर सगळ्यांचीच प्रगती होईल.

भारताची प्रगती वेगाने होत असून येत्या काही वर्षांमध्ये भारत जगातील तिसऱ्या क्रमांकाची आर्थिक महासत्ता होऊ शकेल. चीन पेक्षा भारत हीच खऱ्या अर्थाने जगासाठी उत्पादन केंद्र होऊ शकेल. यासाठी वित्तीय संस्थांची जबाबदारी वाढली आहे. महाराष्ट्राच्या आर्थिक प्रगतीमध्ये सहकारी बँकांचे मोठे योगदान असून महाराष्ट्रात सध्या सर्वाधिक परकीय गुंतवणूक होत आहे, ते पुढे म्हणाले, जनता सहकारी बँकेची वाटचाल ही इतर बँकासाठी आदर्शवत अशी आहे.

मनोगत व्यक्त करताना श्री. चंद्रकांत दादा पाटील म्हणाले, सर्वसामान्य ग्राहकांना व्यवसाय सुरु करण्याचे धाडस जनता बँकेसारख्या सहकारी बँकानी दिले. सरकार काही मर्यादेपर्यंतच सरकारी नोकऱ्या निर्माण करू शकते. बँकांनी यापुढील काळामध्ये तरुणांना आणि विशेष करुन छोट्या उद्योजकांना स्वतःच्या पायावर उभे राहण्यासाठी मदत करावी. मी स्वतः जनता सहकारी बँकेचा खातेदार आहे. माझ्या सुरुवातीच्या कालखंडामध्ये व्यवसाय निर्माण करण्यासाठी जनता सहकारी बँकेने मोलाची मदत केली त्यामुळेच मी उद्योजक म्हणून उभा राहू शकलो.

श्री. भूषण स्वामी म्हणाले, जनता सहकारी बँकेची वाटचाल ही स्वामी समर्थांनी घालून दिलेले विचार आणि मूल्यांवर आधारित आहे, त्यामुळेच ही बँक सर्वसामान्यांसाठी केवळ एक बँक नव्हे तर विश्वासाचे दृढ नाते निर्माण झाले आहे त्यामुळेच सर्वसामान्य खातेदार कोणतीही भीती न बाळगता आपल्या कष्टाने कमावलेला पैसा या बँकेमध्ये ठेवतो. त्यामुळे त्याला ही बँक आपल्या कुटुंबाचे सदस्य आणि आधार वाटते, हेच खातेदार आणि बँकेतील नाते बँकेला आणि खातेदारांनाही दिवसेंदिवस मोठे करीत आहे, असेही त्यांनी सांगितले.

कार्यक्रमास आर्थिक, शैक्षणिक, वैद्यकीय, सामाजिक, राजकीय, क्रीडा क्षेत्रातील मान्यवर, पत्रकार, विविध बँकांचे अध्यक्ष व संचालक, बँकेचे माजी संचालक, शाखांमधील सभासद, खातेदार, हितचिंतक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सौ. विनया देसाई यांनी सूत्रसंचालन केले. बँकेच्या उपाध्यक्षा सौ. अलका पेटकर यांनी आभार मानले.

***

# भारताची आर्थिक सद्यस्थिती आणि नागरी सहकारी बँकांची भूमिका–चर्चासत्र

जनता सहकारी बँकेतर्फे राष्ट्रीय सहकार सप्ताह आणि बँकेच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या सहकारी बँकांच्या परिषदेमध्ये भारताची आर्थिक सद्यस्थिती आणि नागरी सहकारी बँकांची भूमिका या विषयावर चर्चात्मक कार्यक्रमाचे आयोजन पुणे येथे दि.१८ नोव्हेंबर२०२३ रोजी करण्यात आले. व्यासपीठावर जनता सहकारी बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. जगदीश कश्यप, उपाध्यक्षा सौ. अलका पेटकर उपस्थित होते.

ज्येष्ठ बँकिंग तज्ञ श्री.जयंत काकतकर, महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेचे प्रशासक विद्याधर अनास्कर, महाराष्ट्र अर्बन को–ऑपरेटिव्ह बँक फेडरेशनच्या उपाध्यक्षा वैशाली आवाडे, पुणे जिल्हा नागरी सहकारी बँक असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. सुभाष मोहिते, कॉसमॉस बँकेचे अध्यक्ष मिलींद काळे, ठाणे जनता सहकारी बँकेचे अध्यक्ष शरद गांगल, एन के जी एस बी बँकेच्या अध्यक्षा हिमांगी नाडकर्णी, सोलापूर जनता सहकारी बँकेचे अध्यक्ष सुनील पेंडसे आदी या चर्चासत्रामध्ये सहभागी झाले होते.

चर्चासत्रात सर्वांचे स्वागत करताना श्री.जगदीश कश्यप म्हणाले, सहकार्य यशोधनम् या बँकेच्या ब्रीदवाक्यानुसार बँकेची वाटचाल अत्यंत यशस्वीरित्या सुरु आहे. सहकारी बँकांनी एकमेकांशी स्पर्धा करण्यापेक्षा एकमेकांशी सहकार्य केले, तर अधिक वेगाने विकास होऊ शकतो.विना सहकार नही उद्धार यानुसार सहकारी बँकांनी देशाच्या विकासामध्ये एकत्र येऊन अधिक व्यापक प्रमाणात योगदान दिले पाहिजे.

सौ.अलका पेटकर मनोगत व्यक्त करताना म्हणाल्या बदलत्या काळानुसार विकसित होणाऱ्या तंत्रज्ञानामुळे येत्या काळामध्ये सायबर सिक्युरिटी हे सहकारी बँकांसमोरील मोठे आव्हान आहे. या आव्हानाला सामोरे जाण्यासाठी सहकारी बँकांनी एकत्र येऊन प्रयत्न केला पाहिजे.

विद्याधर अनास्कर म्हणाले, ग्राहक जेव्हा छोटा असतो तेव्हा तो सहकारी बँकांमधून व्यवहार करतो, परंतु काही काळानंतर त्याचा व्यवहार वाढला की त्याचा ओढा हा खाजगी आणि राष्ट्रीयकृत बँकांकडे जातो. त्यामुळे सहकारी बँकांनी हा ग्राहक सहकारी बँकेमध्येच राहील व त्याच्या आर्थिक गरजा पूर्ण होतील, त्यासाठी सहकारी बँकांनी एकत्रित येऊन प्रयत्न केले पाहिजे. मिलिंद काळे म्हणाले, सहकारी बँकांवर सर्वसामान्यांचा पूर्ण विश्वास आहे, हे आपणच लोकांना सांगितले पाहिजे. विश्वास वाढला तरच सहकारी बँकांमधील डिपॉझिट वाढते आणि एकूण बँकिंग व्यवसाय अधिक मजबूत होऊ शकेल.

वैशाली आवाडे म्हणाल्या, सहकारी बँका या मुख्यतः ग्रामीण भागातील व्यवसाय आणि शेतीला पूरक अशा व्यवसायांना आर्थिक सहकार्य करतात. सहकारी बँका मजबूत झाल्या तर ग्रामीण अर्थव्यवस्था अधिक गतिशील होऊ शकेल. त्यासाठी रिझर्व्ह बँक आणि सरकारने सहकारी बँकांना अधिक मदत केली पाहिजे.

सुभाष मोहिते म्हणाले राष्ट्रीयकृत बँकांच्या तुलनेत सहकारी बँका या ग्रामीण भागामध्ये अधिक पसरलेल्या आहेत. सर्वसामान्य माणूस हा पैशाने तसेच भावनेने ही त्या बँकांशी जोडला गेलेला आहे. ग्रामीण अर्थव्यवस्था मजबूत करण्याचे काम सहकारी बँकांनी केले आहे.

शरद गांगल म्हणाले, वेगळे सहकार मंत्रालय निर्माण झाल्यापासून रिझर्व्ह बँकेचा सहकारी बँकांकडे पाहण्याचा दृष्टिकोन अत्यंत सकारात्मक झालेला आहे, याचा फायदा घेऊन सर्व सहकारी बँकांनी एकत्रित येऊन व्यवसाय वाढीवर भर दिला पाहिजे. तसेच सहकारी बँकांनी तंत्रज्ञानाचा वापर वाढवून सायबर सिक्युरिटी अधिक मजबूत करण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत, असेही त्यांनी सांगितले. ज्येष्ठ बँकिंग तज्ञ जयंत काकतकर यांनी चर्चासत्राचे सूत्रसंचालन केले.

समारोपीय संबोधनात रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचे संचालक मा.श्री.सतीश मराठे म्हणाले, केंद्रीय पातळीवर स्वतंत्र सहकार मंत्रालय सुरू झाल्यापासून केंद्र सरकार आणि रिझर्व्ह बँकेचा सहकारी बँकांकडे पाहण्याचा दृष्टिकोन अत्यंत सकारात्मक झालेला आहे. सहकारी बँका या केवळ देशाच्या आर्थिक विकासातच नव्हे तर सर्वसामान्यांना आर्थिक आधार देण्याचे काम करतात. देशाची अर्थव्यवस्था पुढील दोन वर्षात पाच ट्रिलियन होणार आहे. यामध्ये देशातील सहकारी बँकांचे महत्वपूर्ण योगदान आहे.

श्री. सतीश मराठे म्हणाले, सहकारी बँकांवर बंधने आणून छोट्या बँका बंद करण्याचे कोणतेही धोरण रिझर्व्ह बँकेचे नाही.बदलत्या काळामध्ये सहकारी बँकांना राष्ट्रीयकृत तसेच खाजगी बँकांशी मोठी स्पर्धा करावी लागणार आहे. सहकारी बँकांनी तंत्रज्ञान आत्मसात करुन आर्थिक व्यवहारांमध्ये अधिक पारदर्शकता आणणे, सायबर सिक्युरिटी सुरक्षा अधिक सक्षम करणे यावर भर दिला पाहिजे.

बँकेचे संचालक श्री. अमित घैसास यांनी आभार मानले. चर्चासत्रात ३७ नागरी सहकारी बँकातील मा.अध्यक्ष, उपाध्यक्ष, मुख्य कार्यकारी अधिकारी, संचालक, असे १५० जण उपस्थित होते.



मा. श्री. सतिशजी मराठे यांचे स्वागत करताना उपाध्यक्षा सौ. अलका पेटकर


चर्चासत्रात उपस्थित विविध बँकांचे मा. अध्यक्ष, संचालक व मान्यवर

# लातूर येथे अमृत महोत्सवी स्नेहमिलन सोहळा

## सहकारी चळवळ खऱ्या अर्थाने पुढे नेणारी महत्वपूर्ण चळवळ आहे - डॉ. अशोकराव कुकडे




सहकारी चळवळ ही खऱ्या अर्थाने समाजाला पुढे नेणारी महत्वपूर्ण चळवळ असल्याचे प्रतिपादन पद्मभूषण डॉ. अशोकराव कुकडे (काका) यांनी जनता सहकारी बँक लि. पुणेच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त लातूरमध्ये दि.१८ जानेवारी २०२४ रोजी आयोजित करण्यात आलेल्या स्नेहमिलन सोहळ्यात बोलताना केले.जनता सहकारी बँक पुणेच्या अमृतमहोत्सवाचे औचित्य साधून बँकेच्या लातूर, अंबाजोगाई व उदगीर शाखांच्या वतीने सभासद व खातेदारांच्या स्नेहमिलन सोहळ्याचे आयोजन हॉटेल उत्सव स्क्वेअरमध्ये करण्यात आले होते. या सोहळ्यास डॉ. कुकडे यांच्यासह ख्यातनाम उद्योजक तथा बँकेचे माजी संचालक श्री. हुकुमचंद कलंत्री, बँकेचे अध्यक्ष श्री. रविंद्र हेजीब, उपाध्यक्षा सौ. अलका पेटकर, संचालक रघुराज बाहेती, मुख्य कार्यकारी अधिकारी जगदीश कश्यप, लातूर शाखेचे व्यवस्थापक मनोज व्यास आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. दीप प्रज्वलन व श्रीरामांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्याक्रमाची सुरूवात झाली. यावेळी आपले विचार व्यक्त करताना पद्मभूषण डॉ. अशोकराव कुकडे यांनी पुणे जनता बँकेच्या सुरुवातीपासून आपला आणि बँकेचा संबंध असल्याचे नमूद केले. सुरुवातीला काही हजार रुपयांपासून सुरु झालेली ही बँक आज हजारो कोटींच्या घरात गेली आहे, हे पाहून अतीव समाधान होत असल्याचे त्यांनी सांगितले, विलक्षण चिकाटी, पारदर्शी व्यवहार, कालानुरुप होणारे बदल स्वीकारताना मूळ मुद्यांशी न केलेली तडजोड हे या उत्तुंग यशामागचे रहस्य आहे. विवेकानंद रुग्णालयाची पहिली इमारत पुणे जनता बँकेच्या सहकार्यानेच उभी राहिल्याचे त्यांनी आवर्जून सांगितले. कोणत्याही उद्योग व्यवसायाचा पाया मजबूत असेल तरच इमारत मजबूत होते. ही बाब या बँकेच्या बाबतीत तंतोतंत लागू पडते. लातूरच्या शाखेचा व्यापार, व्यवहार मोठ्या प्रमाणावर वाढल्याने या शाखेचा विस्तार करण्याचा दृष्टीने व्यवस्थापनाने निर्णय घेण्याची वेळ आल्याचे सांगताना डॉ. कुकडे यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या प्रेरणेने केवळ ही एकच बँक चालते असे नसून एकूण ४६ बँका यशस्वीपणे चालविण्यात येत असल्याचे नमूद केले. संघ परिवार मूलभूत तत्व, दायित्व निभावण्याचे कौशल्य, संघटन, माणसे सोबत कशी घ्यावीत हे शिकविण्याचे काम करत असल्याचे सांगितले. श्री. हुकुमचंद कलंत्री यांनी आपले विचार व्यक्त करताना पुणे जनता बँकेने आर्थिक व्यवहार करताना सामाजिक बांधिलकी जोपासण्याचे काम वेळोवेळी केल्याचे सांगितले. लातूरच्या जडणघडणीत जनता बँकेचा मोठा वाटा आहे. लातूरच्या आडत बाजाराच्या उभारणीसाठी जनता बँकेने केलेले सहकार्य कधीही विसरणे शक्य नसल्याचे ते म्हणाले . जनता बँक कधीही आपल्या मूळ उद्देशापासून दूर गेली नाही. जनता बँकेचे अध्यक्ष श्री.रविंद्र हेजीब यांनी आपले विचार व्यक्त करताना आपली बँक अमृत महोत्सवी वर्षात निश्चित केलेल्या उद्दीष्टपूर्तीच्या दिशेने वाटचाल करीत असल्याचे सांगितले. सर्वांच्या सहकार्य व प्रयत्नाने ३१ मार्च २०२४ ची आकडेवारी निश्चितच उत्साहवर्धक राहील असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.जगदिश कश्यप यांनी आपले मनोगत व्यक्त करताना संपूर्ण राज्यात आपल्या बँकेच्या लातूर शाखेची वेगळी ओळख असल्याचे सांगितले.लातूरच्या विकासासाठी बँकेने मोलाचे योगदान दिल्याचे त्यांनी नमूद केले. बँकेच्या उपाध्यक्षा सौ. अलका पेटकर यांनी जनता बँक आणि लातूरचे एक विलक्षण नाते असल्याचे सांगितले. बँकेच्या लातूर शाखेचे व्यवस्थापक श्री.मनोज व्यास यांनी प्रास्ताविक केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. अंजली जोशी यांनी तर आभार प्रदर्शन संचालक श्री. रघुराज बाहेती यांनी केले. या कार्यक्रमास मुख्य कचेरीमधील महाव्यवस्थापक श्री. धनंजय सहस्त्रबुद्धे, उपमहाव्यवस्थापक श्री. मनोज मेंडजोगी, श्री. संजय आगाशे, बँकेच्या तिन्ही शाखांचे व्यवस्थापक, खातेदार, सभासद, व्यापारी, प्रतिष्ठित नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली. स्नेहमिलन सोहळ्याबद्दल सर्वांनी समाधान व्यक्त केले.

***

# अमृत महोत्सवानिमित्त पेण शाखेतील विविध उपक्रम

बँकेच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त पेण शाखेत दिनांक १८ डिसेंबर २०२३ रोजी सकाळी ११.०० ते २.०० या वेळेत आरोग्य तपासणी शिबीर आयोजीत करण्यात आले. सदर शिबीरास मेडी एड हेल्थ केअर चे डॉ. पवन दुबे व त्यांची टीम यांचे सहकार्य लाभले. सदर शिबिरात ब्लड प्रेशर, ऑक्सिजन सॅच्युरेशन, हार्ट रेट, आय चेक अप, बॉडी फॅट, या सारख्या बऱ्याच तपासण्या मोफत घेण्यात आल्या. केअर हेल्थ इन्शुरन्स चे प्रतिनिधी श्री. मनिष नारकर व त्यांचे सहकारी यांचे आरोग्य शिबीर घेण्यात सहकार्य लाभले व ते स्वतः शिबिरात उपस्थित होते.तपासणी शिबीरात मोठ्या संख्येने खातेदार सहभागी झाले होते. त्याचबरोबर मॅक्स लाईफ इन्शुरन्स चे प्रतिनिधी श्री. इरफान शेख यांनी इन्शुरन्स बाबत माहिती दिली. तसेच दुपारी ४ वाजता भाऊसाहेब नेने कॉलेज पेण येथील सभागृहात व्यावसायिक मेळावा आयोजित केला होता सदर कार्यक्रमास प्रमुख पाहुण्या म्हणून सौ. अश्विनी गाडगीळ उपस्थित होत्या, बँकेचे संचालक व पेण शाखेचे संपर्क संचालक मा. श्री. श्रीरंग परस्पाटकी, संचालक मा. श्री. प्रभाकर कांबळे, तसेच बँकेचे उपमहाव्यवस्थापक मा.श्री. संदीप गानू , मा. श्री. सचिन ताम्हणकर व शाखेचे गार्डियन एक्झिक्युटिव्ह मा. श्री. आशिष नवरे उपस्थित होते. दिपप्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. शाखा व्यवस्थापक श्री. संतोष गायकवाड यांनी उपस्थितांचे स्वागत व प्रास्ताविक केले. प्रमुख पाहुणे सौ. अश्विनी गाडगीळ यांचा सत्कार श्री. श्रीरंग परस्पाटकी यांच्या हस्ते करण्यात आला. सौ. गाडगीळ यांच्या अहिल्या मंडळास महाराष्ट्र शासनातर्फे 'आदिवासी सेवा संस्था'पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. श्री. आशिष नवरे यांनी बँकेच्या प्रवासा विषयी माहितीचे प्रेझेंटेशन केले. प्रश्नोत्तर कार्यक्रमात संचालक व अधिकारी यांनी आवश्यक माहिती दिली. त्यानंतर बँकेचे संचालक मा. श्री. परस्पाटकी यांनी बँकेच्या उद्योगस्नेही धोरणाबद्दल माहिती दिली. लघुउद्योजक यांना सुलभ कर्ज पुरवठा होण्याबाबत बँकेचे धोरण लवचिक असून, कर्ज वितरण गतीमान असल्याने उद्योजकांना याचा चांगला फायदा होत आहे. तसेच उपस्थित व्यावसायिकांना बँकेबरोबर सहयोग करण्याबाबत आवाहन केले. त्यानंतर प्रमुख पाहुणे सौ. गाडगीळ यांनी त्यांचे मनोगत व्यक्त केले त्यात त्यांनी पेण च्या आजुबाजूला छोटी गावे आहेत त्या ठिकाणी शेती करणाऱ्या महिलांना / पुरुषांना ४ ते ५ महिन्यांकरिता मायक्रो फायनान्स लागतो तरी अशा गरजू शेतकऱ्यांना बँकेकडून काही फायनान्स मिळण्याची व्यवस्था व्हावी असे त्यांनी सुचविले. सदर कार्यक्रमाचे सूत्र संचालन शाखेचे सहाय्यक शाखा व्यवस्थापक श्री. देविदास यशवंते यांनी केले. सदर कार्यक्रमास मोठ्या संख्येने व्यावसायिक उपस्थित होते. सदर व्यावसायिक मेळाव्याचा पेण शाखेच्या व्यवसाय वाढीस नक्कीच फायदा होईल.




सौ. अश्विनी गाडगीळ यांचे स्वागत करताना बँकेचे संचालक श्री. श्रीरंग परस्पाटकी



आरोग्य तपासणी शिबीरात सहभागी ग्राहक

# सायकल रॅली

जनता बँक पुणे आपले अमृत महोत्सवी वर्ष साजरे करीत आहे आणि जनता बँक पुणे कला क्रीडा मंडळ आपले रौप्य महोत्सवी वर्ष साजरे करीत आहे, यानिमित्ताने गो ग्रीन या संकल्पने अंतर्गत जनता बँक पुणे कला क्रीडा मंडळातर्फे सायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले.

प्रमुख पाहुणे म्हणून शिव छत्रपती पुरस्कार विजेते मा. श्री. शिरीन गोडबोले उपस्थित होते. बँकेचे अध्यक्ष मा. श्री. रवींद्र हेजिब, उपाध्यक्षा ॲड. सौ. अलका पेटकर, मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. जगदीश कश्यप व असोसिएशन चे अध्यक्ष श्री. प्रसाद पोटभरे व कला क्रीडा मंडळाचे अध्यक्ष श्री कौस्तुभ खाकुर्डीकर यांच्या शुभहस्ते सायकल रॅलीला झेंडा दाखवून सुरुवात करण्यात आली. बँकेचे मा. संचालक श्री. मंदार फाटक व मा. मुख्य महाव्यवस्थापक श्री. यशवंत ढवळीकर रॅलीमध्ये सायकलपटू म्हणून सहभागी झाले होते.

पुणे व पिंपरी चिंचवड शहरातील २७ शाखा व मुख्य कचेरीतील २४ विभागातून रॅलीमध्ये ८९ महिला व पुरुष सायकलपटुंनी सहभाग नोंदविला. रॅलीच्या निमित्ताने अनेक सेवकांनी सायकल चालविण्याचा सराव केला.

बाजीराव रोड येथुन सुरुवात झालेल्या सायकल रॅलीने पुण्यातील पेठ परिसर, छ.शिवाजी नगर, डेक्कन परिसरातून मार्गस्थ होत कर्वे रोडवरील स्वा. सावरकर स्मारक येथे समापन झाले.

जनता बँक पुणे स्टाफ वेलफेअर असोसिएशन, जनता बँक पुणे वेलफेअर सोसायटी, जनता बँक पुणे गणेशोत्सव मंडळाचे पदाधिकारी, सर्व सहकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



बाजीराव रोड शाखा येथे सायकल रॅलीस सुरुवात होत असताना



सायकल रॅलीत सहभागी असलेले सर्व सायकलपटू

## रक्तदान शिबीर

बँक १८ ऑक्टोबर २०२३ ते १८ ऑक्टोबर २०२४ हे वर्ष अमृतमहोत्सवी वर्ष म्हणून साजरे करीत आहे. त्याचे औचित्य साधून व सामाजिक बांधिलकीच्या जाणीवेतून बँकेने मुख्य कार्यालय, सातारा रोड, पुणे येथे रविवार, दिनांक १८ फेब्रुवारी २०२४ रोजी बँकेच्या सेवकांसाठी व ग्राहकांसाठी जनकल्याण रक्तपेढी, पुणे यांच्या सहकार्याने भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन केलेले होते.

सदर कार्यक्रमास रा. स्व. संघ, पुणे महानगराचे कार्यवाह श्री. सचिनजी भोसले, अभिनेते श्री. योगेशजी सोमण, शिक्षिका व बँकेच्या खातेदार सौ. अंजना सोनवणे या सोबतच व्यावयायिक व बँकेचे खातेदार श्री. दिनेशजी शहा हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. त्याचप्रमाणे बँकेचे अध्यक्ष मा.श्री. रविंद्र हेजीब, उपाध्यक्षा मा.सौ. अलका पेटकर, मुख्य कार्यकारी अधिकारी मा.श्री.जगदीश कश्यप, तसेच मा. संचालक, सेवक, खातेदार उपस्थित होते. सर्व प्रमुख पाहुण्यांचा गुलाबाचे रोप देऊन सत्कार करण्यात आला.

संचालक सौ. पद्मजा कुलकर्णी यांनी रक्तदानाचे महत्व सांगताना त्यात महिलांचा देखील जास्तीत जास्त सहभाग असावा तसेच रक्तदान हा विषय घाबरण्याचा नाही, असे आवर्जून सांगितले. सौ. अंजना सोनवणे यांनी आत्तापर्यंत ८४ वेळा रक्तदान केले आहे व श्री. दिनेश शहा यांनी आत्तापर्यंत ९४ वेळा रक्तदान केले आहे. सौ. सोनवणे व श्री. शहा यांनी रक्तदानाचे जीवनातील महत्व व एखाद्या व्यक्तीला जीवनदान मिळाल्यामुळे मिळणारे समाधान अवर्णनीय असल्याचे नमुद केले. जेव्हा जेव्हा संधी मिळेल तेव्हा रक्तदान करा असे आवाहन त्यांनी केले.कार्यक्रमात आत्तापर्यंत ५० पेक्षा जास्त वेळा रक्तदान केलेले आहे अशा सेवक व ग्राहकांचा बँकेच्या वतीने सत्कार करण्यात आला.

शिबिरात एकूण २७५ रक्त पिशव्यांचे संकलन झाले. शिबिरात महिला सेवक व खातेदार यांचादेखील सहभाग उल्लेखनीय होता.




रक्तदान शिबीर उद्घाटन कार्यक्रमास उपस्थित मान्यवर



रक्तदान शिबिराचे उद्घाटन श्री. योगेश सोमण यांनी स्वतः रक्तदान करुन केले.

**Dr. Hema Yadav**
Director, VAMNICOM, Pune

**Ms. Kalyani Sahoo**
Programme Officer,
Team NCP Secretariat, VAMNICOM, Pune

The National Cooperation Policy is formulated to provide guidance and pathways for realizing the vision of achieving prosperity through cooperation. The policy promotes the concept of mutuality & inclusivity to establish level playing field for cooperatives to emerge as vibrant societies securing the socio-economic well-being through sustainable development and affirming on 'Sahakar se Samriddhi.

The committee for drafting the National Cooperation Policy document was constituted by the Ministry of Cooperation, Govt of India under the chairmanship of Shri Suresh Prabhu and with representatives of National / State/ District & Primary Cooperative Societies and their federations; Secretaries of Cooperation Department & Registrars of Cooperative Societies of States / UTs; from academia, and Officers from Central Ministries / Departments, as its members. Vaikunth Mehta National Institute of Cooperative Management (VAMNICOM),Pune is the National Cooperation Policy Secretariat and it provides secretarial assistance and support to the committee of National Cooperation Policy.

The national policy on cooperatives will empower the sector through the numerous initiatives taken by Ministry of Cooperation, Govt of India such as economic strengthening of Primary Co-Operative Societies; relief in Income Tax Law for Co-operative Societies; redressal of difficulties faced by Co-operative Banks ; revival of Cooperative Sugar Mills and establishment of three new Multi-State Cooperative Societies at the national level.

NCP Secretariat, VAMNICOM, Pune has conducted continuous and collaborative stakeholder consultations alongwith regional workshops to seek variety of views and incorporate them suitably in guidance of the committee.

The vision of the National Cooperation Policy is to realize ***"Sahakarita-se-Samriddhi"*** (prosperity through Cooperation) by strengthening movement of cooperation in the country through collaboration and deepening its reach to promote economic development for equitable and inclusive growth.

The key recommendations of the policy on cooperatives include the creation of a legal framework and a level playing field for cooperatives, credit structure and financing, infrastructure and technology adoption, proper governance structure, promoting education and training. The NCP prioritizes credit structure & financing of cooperatives and collectives. The key policy recommendations for the credit structure prescribed are:

- ➢**Strengthen and expand rural and urban cooperative credit** system by encouraging credit, banking, and financing structural convergence to support primary cooperatives, and other forms of sectoral enterprises

- ➢Set up **national-level umbrella entities** for rural and urban cooperative banking sector for promoting internal financial stability and growth and ensuring adequate credit support to sector enterprises

- ➢**Assistance to defunct cooperatives** and provide support for reviving/strengthening cooperatives and for building infrastructure

- ➢ **Developing and standardizing the cooperative credit system** to regularize and enhance the of trust of public/depositors.

The policy envisions cooperatives as vibrant entities on national & global level which can contribute to higher socio-economic value by venturing into new sectors to expand reach,value and replicating the growth and success stories.




गरुड झेप

गरुड झेप ही गृहपत्रिका केवळ खाजगी वितरणासाठी प्रकाशित केली आहे. यातील मते व्यक्तिगत असून बँक त्याचेशी सहमत असेलच असे नाही. गृहपत्रिकेसाठी लिखाण, सूचना इ. साठी मनुष्यबळ विकास विभाग, मुख्य कचेरी येथे संपर्क करावा.
दूरध्वनी : ०२०-२४४०४४८३